महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

**क्रमांक : सीएमए-०४२६/प्र.क्र४२/२०२६/जाहिरात** **दिनांक :- १६ जुलै, २०२६**

## -: शुद्धिपत्रक :-

## महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२६

**जाहिरात क्रमांक: ०१७/२०२६, दिनांक २५ जून, २०२६**

महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२६ मधून एकूण २६१९ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक २५ जून, २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून जाहिरातीमध्ये प्रस्तुत परीक्षा ऑनलाईन – संगणक प्रणालीवर आधारित (CBT) पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले होते. तथापि प्रस्तुत परीक्षा प्रचलित पद्धतीने (Offline - OMR आधारित) घेण्याबाबत उमेदवारांकडून होत असलेली मागणी व उमेदवारांकडून प्राप्त निवेदने विचारात घेऊन ऑनलाईन – संगणक प्रणालीवर आधारित (CBT) पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय जुलै, २०२७ अखेर पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहे. त्यामुळे महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२६ प्रचलित पद्धतीने (Offline) OMR आधारित घेण्यात येणार आहे. महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२६ पूर्वी घोषित केलेल्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२६ ऐवजी **सुधारित दिनांकास, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२६** रोजी आणि **महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त मुख्य परीक्षा - २०२६ दिनांक २७ डिसेंबर, २०२६** रोजी घेण्यात येईल.

२. उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२६ करीता उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी, **अर्ज स्वीकारण्याच्या दिनांकास खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक ३१ जुलै, २०२६ रोजी २३:५९ वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.** |
| २ | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | **दिनांक ०३ ऑगस्ट, २०२६ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** |
| **चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याची सवलत बंद करण्यात आली असून उमेदवारांनी फक्त ऑनलाईन पद्धतीने (डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, UPI) शुल्क भरणे आवश्यक आहे.** | | |

**३. जिल्हा केंद्र निवड :-**

**३.१** महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ प्रचलित पद्धतीने (Offline - OMR आधारित) राज्यातील ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल.

**३.२** नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**३.३** महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ करीता **यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी जिल्हा केंद्राची निवड करण्यासाठी** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या उमेदवारांच्या प्रोफाईल मधील "My Account" सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीसमोर (जा.क्र ०१७/२०२६) उपलब्ध करून देण्यात आलेल्या " View" बटनावर व त्यानंतर " Center Selection" बटनावर क्लिक करून इच्छित जिल्हा केंद्राची निवड करून "Apply व Submit" बटनावर क्लिक करावे. वरीलप्रमाणे जिल्हा केंद्र निवडीची कार्यवाही **दिनांक १९ जुलै, २०२६ रोजी दुपारी १४.०० वा. पासून दिनांक ३१ जुलै, २०२६ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** पूर्ण करणे अनिवार्य आहे. फक्त जिल्हा केंद्राची निवड करणाऱ्या करणाऱ्या उमेदवारांना पुन्हा परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**३.४** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराचा पत्ता (Correspondence Address) विचारात घेऊन परीक्षेचे ठिकाण निश्चित करण्यात येईल.

**३.५** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**३.६** एकदा निवडलेल्या अथवा आयोगाने निश्चित केलेले जिल्हा केंद्र / परीक्षा उपकेंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**४.** वरील व्यतिरिक्त मूळ जाहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

(सं. पां. देशमुख)
उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

दिनांक : १६ जुलै ,२०२६